# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/10/2021 (बुधवार)

---

## खून

पो.स्टे. काटोल :- दिनांक 05/10/2021 चे 16.00 वा. ते 16.30 वा. दरम्यान फिर्यादीची मुलगी/मृतक वय 25 वर्ष ही एका झोपडीत एकटी असतानी आरोपी नामे- **अमलेश कूमार शंभू मंडल** रा महाक्रेट सिमेंट पाईप फॅक्टरी सावरगाव रोड, डोंगरगाव, एमआयडीसी काटोल याने तिचा विनयभंग करण्याच्या उदेशाने झोपडीत गेला असता मृतक महीला हीने आरोपीस विरोध केला असता यातील आरोपीने तिचा गळा दाबून जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 302, 354, 354(ब) भादंवि. मधील विशेष अहवाल सादर/21 अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास **सपोनि श्री मनोज चौधरी मो नं 8975755969** हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. काटोल :- अंतर्गत 05 कि.मी. अंतरावरील ढिवरवाडी शिवार येथे 05/10/21 चे 11.30 वा. सुमारास येथे फिर्यादी नामे- आदित्य राजीव धवड वय 31 वर्ष रा धवड पेट्रोलपंप काटोल यांचे ढिवरवाडी शिवारातील शेतातुन अज्ञात आरोपीतांनी त्यांच्या ताब्यातील एमएच- 04/एफयू- 0239 क्रमांकाच्या लाल रंगाची टाटा झेनॉन पिकअप गाडीमध्ये मोसंबीचे शेतातुन 58 बोरे किंमती 50,000/-रू. चा मुद्देमाल तोडून चोरून नेत असता शेतातील राखनदार यांनी टार्च लावून पाहत असता यातील आरोपी गाडी शेतात सोडून पळून गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379,511,34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास तपास तपास मपोहवा पंचफुला मोरे मो.क्र. 9049607115 हे करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. मौदा :- दिनांक 05/10/2021 चे 13.00 वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय 35 वर्ष हि आपल्या घरी हजर असतांना आरोपी नामे- गौरीशंकर ओमप्रकाश आमिलढुके, वय 32 वर्ष, रा. दहेगाव तह. मौदा याने ती एकटी असल्याचा फायदा घेउन घरात अनाधिकृतपणे प्रवेश करून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 452, 354, 354 (1)आय भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार हरीष युगलवार 9423219429 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– दिनांक 05/10/2021 चे 14.30 वा. ते 14.50 वा. दरम्यान फिर्यादीची पीडित अल्पवयीन मुलगी वय 11 वर्ष हि आपल्या घरी हजर असतांना आरोपी नामे– लिलाधर बागडे, वय 45 वर्ष, रा. खूटबा याने फिर्यादीचे घरी येवून दिवानवर बसून पीडितेस 'इकडे ये' असा आवाज दिला. परंतू पीडिता घरात न गेल्याने आरोपी पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 451, 354 भादंवी. कायद्यान्वये सहकलम 12 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि सारीका गुरूकार 9665834999 या करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. कोंढाळी :– दिनांक 04/10/2021 चे 11:30 वा. दिनांक 05/10/2021 चे ते 11.45 वा. चे सुमारास आरोपी नामे– ऋषीकेश कैलाश कुहीके वय 19 वर्षे रा. खैरी ता. काटोल जि. नागपुर याने वय 15 वर्षीय पिडीत/ फिर्यादी मुलगी हिचे सोबत प्रेम संबध जुळवुन, तिला फुस लावुन मोटार सायकल वरून पळवुन नेवुन, तिचे सोबत जबरदस्तीने दोन ते तिन वेळा वारंवार शारीरीक संबध केले. सदर घटनेबाबत कोणाला सांगु नको अशी धमकी दिल्याने, फिर्यादी व तिच्या आईने त्यांचे नातेवाईकांशी चर्चा करून चर्चेअंती पो.स्टे. ला येवुन तक्रार दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 363, 376(2)(एन),376(3),506 भादंवि.सहकलम 4, 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि सारिका गुरूकर 9665834999 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर